# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

| | | | |
|---|---|---|---|
| * वर्ष ६५ वे | * अंक ९८ | * नांदेड | * मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ |
| * पृष्ठे ६ | * किंमत २ रुपये | | ☎ : 255777, Fax :252211 |









गोदातीर समाचार




**विनम्र अभिवादन**


भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज जयंती. त्यानिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन.


–संपादक







विश्वरत्न, भारतरत्न, महामानव
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांच्या 135 व्या जयंती निमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक :
ललिता मारोती मुनेश्वर
नगरसेविका किनवट


विश्वरत्न
भारतीय राज्यघटनेचे
शिल्पकार बोधिसत्व प.पु
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांच्या 135 व्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !
-अभिवादक-
निरंजना राजू लांडगे
उपसभापति महिला बालकल्याण समिति, म.न.पा. नांदेड
प्रकाशक - व्यंकट इंगळे सामाजिक कार्यकर्ते


घायाळ पाखरांना
पंख दिले तु.
मुक्या वेदनांना
शब्दही दिलेस तु.
तुझ्याच चैतन्येने
जगण्यालाही अर्थ आला.
युगा-युगांच्या शोषितांचा
उध्दार तुच केला.
हे महामानवा,
तुम्हाला 135 व्या जयंतीनिमित्त
कोटी-कोटी वंदना
अभिवादनकर्ते:-
आयु. देवा भिमराव पवार बाचोटीकर,
सिडको, नांदेड.


महामानव
विश्वरत्न भारतीय राज्यघटनेचे
शिल्पकार बोधिसत्व प.पु
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांच्या 135 व्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !
-अभिवादक-
रमेश तालिमकर
देवा भाऊ फाउंडेशन नांदेड लोकसभा समन्वयक तथा
ग्रा.पं.सदस्य प्रतिनिधी, गोपाळचावडी ग्रामपंचायत ता. जि. नांदेड


ज्ञानाच्या अथांग सागरास
त्रिवार वंदन...
ज्ञानसूर्य,
महामानव, भारतरत्न
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांच्या जयंतीदिनी
कोटी-कोटी वंदन!
ज्ञानसूर्य
शुभेच्छुक : स्वराज इंटरप्राईजेस, नांदेड
सानवी ट्रेडर्स, नांदेड
श्रीनिवास ट्रेडर्स, नांदेड
चिंतामणी ट्रेडिंग कंपनी, नांदेड


੧ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥
पिवहु पाहुल खंडेधार होए जनम सुहेला ।।
वाहु वाहु गोबिंद सिंघ आपे गुरु चेला ।।
तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिब, नांदेड.
की ओर से
खालसा पंथ साजना दिवस
वैसाखी पुरब
की समुह साध-संगत को
हार्दिक बधाईयां..
-: शुभेच्छुक :-
डॉ. स. विजय सतबीर सिंघ IAS(Retd.)
प्रशासक
संत बाबा कुलवंत सिंघ जी
जत्थेदार साहिब
प्रकाशक : अधिक्षक - गुरुद्वारा बोर्ड, तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिब, नांदेड.
Call center No.: 82977 82977 I E-mail : contact@hazursahib.com I Visit us at : http://www.hazursahib.com

## पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाच्या नांदेडमध्ये धाडी

# अर्धापूर येथे नकली जर्दा बनविणाऱ्याचा पर्दाफाश तर देगलुरात जुगार अड्ड्यावर छापा, ७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)** –अर्धापूर येथे नकली जर्दा बनविणाऱ्याच्या घरी छापा मारून त्याचा पर्दाफाश केला तर देगलूर येथे जुगार अड्ड्यावर छापा मारून या घटनेत पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाने ७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्या अधिपत्याखालील पथकाची नांदेड जिल्ह्यात रवानगी केली होती. सोमवार, दिनांक १३ एप्रिल रोजी या पथकास अर्धापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत इंदिरानगर येथे सय्यद जाकीर ऊर्फ बाबा गुलाम दस्तगीर (वय ४० वर्ष, रा. इंदिरानगर, अर्धापूर) हा नकली सुगंधित जर्दा बनवत असल्याची माहिती मिळाली. यावरून पथकाने या इसमाचे घरी छापा टाकला असता त्या ठिकाणी सुगंधित जर्दा, एक जर्दा बनविण्याची मशीन, ग्लिसरीन व पॅराफीन असा एकूण ३ लाख ४४ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. सदर आरोपी हा कमी प्रतीच्या जर्दामध्ये ग्लिसरीन व पॅराफीन मिसळून नामांकित कंपनीचा सुगंधित जर्दा तयार करत असे व नंतर मशीनच्या सहाय्याने पॅकींग करून तो बाजारात विक्रीसाठी पाठवत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या प्रकरणी आरोपी सय्यद जाकीर ऊर्फ बाबा यास ताब्यात घेवून त्याचेविरुध्द अर्धापूर पोलीस ठाणे येथे गुरनं १९६/२०२६ कलम १२३ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास अर्धापूर पोलीस ठाण्यातील पोहेकॉ संतोष काळे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

तत्पूर्वी, सदर पथकाने दिनांक १२ एप्रिल रोजी सायंकाळी देगलूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मौजे कुषावाडी शिवार येथील रंजित भाऊराव इंगोले यांचे शेतातील आखाड्यावरील रुममध्ये तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्या ८ इसमांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ३६ हजार ३४० रुपयांची रोकड, ८ मोबाईल व ७ मोटार-सायकली असा एकूण ३ लाख ९३ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यांचेविरुध्द देगलूर पोलीस ठाणे येथे गुरनं १८१/२०२६ कलम १२ (अ), महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास देगलूर पोलीस ठाण्यातील पोउपनि



महाजन मैसनवाड यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

उपरोक्त दोन्ही कारवायांत पोलीस पथकाने एकूण ३६,३४० रुपयांची रोकड व मुद्देमाल असा एकूण ७,३७,७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपीतांविरुद्ध वरीलप्रमाणे गुन्हे नोंद केले आहेत.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ संजीव जिंकलवाड, पोकॉ. गणेश धुमाळ व पोकॉ. कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती गोपनीयपणे ९१ ५० १०० १०० या 'खबर' हेल्पलाईनवर द्यावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

## भीम जयंतीनिमित्त आज विविध कार्यक्रमांचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, दि. १४ एप्रिल रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास जिल्हा परिषद परिसरातून बँड वाजत-गाजत मिरवणूक काढून अभिवादन करण्यात येणार आहे.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, दत्तात्रय गिरी, प्रशांत थोरात, मयूरकुमार आंदेलवाड, अमित राठोड, कार्यकारी अभियंता राहूल रावसाहेब, संजय शिंदे, राहुल भोजराज, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. सखाराम खुणे, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माधव सलगर, दिलीपकुमार बनसोडे, कृषी अधिकारी नीलकुमार ऐतवडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## भीम जयंतीनिमित्त शहरातील वाहतूक मार्गात बदल

**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती-निमित्त मंगळवार, दि. १४ एप्रिल रोजी शहरातून मोठ्या प्रमाणात मिरवणुका काढण्यात येणार आहेत. त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होऊ नये यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी मिरवणुका जाणाऱ्या रस्त्यावरील वाहतूक तात्पुरत्या स्वरूपात पर्यायी रस्त्यावर वळविली आहे.

**वाहतुकीकरिता बंद असलेले मार्ग**

जुना मोंढा ते देना बँक- महावीर चौक- तरोडकर मार्केट- वजिराबाद चौकपर्यंत जाण्या- येण्यासाठी वाहतुकीस पूर्णपणे बंद राहील.

महावीर चौक-चिखलवाडी चौक- हिंगोली गेटकडे जाणारा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद राहील.

सिडको-हडकोकडून जुना मोंढ्यात नवीनपूल मार्ग सिडको-हडको जाण्या-येण्यासाठी वाहतूक पूर्णपणे बंद राहील. कविता हॉटेल ते भगतसिंग चौक- जुना मोंढ्याकडे येणाऱ्या वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद राहील.

**वाहतुकीकरिता पर्यायी मार्ग**

जुना मोंढा ते देना बँक- महावीर चौक- वजिराबाद चौकाकडे येणारी वाहतूक ही लोहारगल्ली- केळी मार्केट- भंगार लाईन- गिटी क्रेशर बाफना टी पाईंट मार्गे ये-जा करता येईल.

महावीर चौक- हिंगोली गेटकडे जाण्यासाठी श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते रेल्वे स्टेशन- हिंगोली गेट असा राहील. सिडको- हडकोकडून येणारी वाहतूक जुना कौठा पोलीस चौकी- रविनगर- गोवर्धनघाट- तिरंगा चौक मार्गे वजिराबाद चौक मार्गे वाहतूक ये-जा करता येईल.

कविता हॉटेल ते भगतसिंग चौक-जुना मोंढ्याकडे जाणारी वाहतूक ही बाफना टी पॉईट-गिट्टी क्रेशर-केळी मार्केट रोड मार्गे ये-जा करता येईल.

वाहतूक मार्गातील बदल हा दि. १४ एप्रिल रोजी दुपारी दोन ते रात्री दहा वाजेपर्यंत वाहतुकीस अडथळा होऊ नये याकरिता अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

# विद्यार्थिनीची छेड काढणाऱ्या आरोपीची पोलिसांनी काढली वरात; निजामबाद येथून केली अटक



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या सिडको परिसरात एका महाविद्यालयात जाऊन नववीच्या विद्यार्थिनीशी गैरवर्तन करणाऱ्या आरोपीला निजामबाद येथून पोलिसांनी अटक केली. त्याची सोमवारी सिडको परिसरातून वरात काढण्यात आली. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी प्रज्योतसिंग सिद्धू रा. ढाकणी याने दोन दिवसांपूर्वी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील शिवाजी विद्यालयामध्ये जाऊन एका नववीतील मुलीशी गैरवर्तन करून तिची छेड काढली होती. ग्रामीण पोलिसांनी त्यात तत्काळ पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करून फरार आरोपीस डीबी पथकाने निजामबाद येथून अटक केली. सदर आरोपीवर यापूर्वी सोनखेड येथे गुन्हा दाखल आहे.

तसेच ग्रामीण पोलिसांनी त्यास मुख्य मार्केटने फिरवून शाळेमध्ये नेले आणि सर्व विद्यार्थी, नागरिक यांना आवाहन केले की, या आरोपीने इतर कोणासोबत गैरवर्तन केले असल्यास त्याविरुद्ध पोलीस स्टेशनला माहिती द्यावी किंवा समोर यावे त्यावर अजून गुन्हे दाखल करता येतील.

तसेच कुठल्याही शाळेजवळ क्लासेसला कॉलेजमध्ये कोणीही मुलींची छेडछाड करण्याचा प्रयत्न करत असेल किंवा गैरवर्तन करत असेल तर ११२ वर कॉल करावा. महाराष्ट्र पोलिसांची फ्री सुविधा असून, दोन मिनिटांमध्ये पोलीस आपल्याला मदतीसाठी पोहचतील. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी सदर आरोपीस चांगलाच पोलिसी हिसका दाखवला आहे.

# कुंडलवाडी पोलिसांचा छाप्यात १२ जुगारी अटक; अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या पिंपळगाव (कु.) शिवारातील दगडे यांच्या शेताजवळ पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत कारवाई करून जुगार अड्डा उध्वस्त केला. या अड्ड्यावरून बारा जणांना अटक करून त्यांच्याकडून रोख रक्कम व अन्य साहित्य असा अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई रविवार दिनांक १२ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आली.

दिनांक १२ एप्रिल रोजी कुंडलवाडी ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांना गोपनीय माहीती मिळाली की, हद्दीत पिंपळगांव (कु) शिवारात दगडे यांच्या शेताजवळ कांही जुगारी अवैधरित्या तिर्रट नावाचा जुगार पत्त्यावर पैसे लावुन खेळत आहेत. अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने श्री शिंदे यांनी आपले सहकारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर व त्यांच्या सहकाऱ्यांना तेथे पाठवून कारवाई करण्याचे आदेश दिले. पथकाने त्या ठिकाणी छापा कारवाई केली असता तिथे जवळपास १२ जुगारी जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी त्यातील चार जणांना ताब्यात घेतले. काही जुगारी पोलीस दिसताच पसार झाले. पोलिसांनी जुगार अड्ड्यावरून नगदी २४ हजार ४०० रुपये, घटनास्थळावरुन तसेच आरोपीच्या ताब्यातुन जप्त ५२ बदक छाप पत्ते, ४ मोटारसायकल व जुगाराचे साहीत्य असा मिळुन एकुण २ लाख ३४ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने तो पंचासमक्ष जप्त करुन पोलीस स्टेशन कुंडलवाडी येथे १२ इसमांवर कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाबाराव गंगाधर निमशेट्टे (वय ३५ वर्ष व्यवसाय शेती रा. चिरली ता. बिलोली), हाणमंत अंबादास घोगरे (वय २५ वर्ष रा. चिरली), सचिन विश्वनाथ खंडगावे रा. चिरली, रामदास बापुराव बोगरे (वय ३५ वर्ष व्यवसाय शेती रा. चिरली) ताब्यात घेण्यात आलेले वरील जुगारी. तर फरार अशोक लच्छीराम राठोड रा. पिंपळगांव (कु) ता. बिलोली, बालाजी प्रभाकर कदम रा. चिरली, संदिप सोलगिरे रा. हुनगुंदा, श्रीकांत लिंबशेट्टे रा. हुनगुंदा.

जप्त मुद्देमाल

मो.सा एम.एच २६ बी.यु. ८९०८ चा मालक, मो.सा एम.एच २६ एक्स ५८३४ चा मालक, मो.सा एम.एच २६ यु ६६४९ चा मालक, मो.सा एम. एच २६ ए. झेड ६९३० चा मालक. कुंडलवाडी पोलीस ठाणे येथील नमूद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे त्यांचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक करुन अभिनंदन केले आहे.

## गणेश काशेटवार यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**–शहरातील



श्रीनगर भागातील ज्येष्ठ नागरिक तथा जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त कक्ष अधिकारी गणेश रघुनाथराव काशेटवार यांचे रविवार, दि. १२ एप्रिल रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दि. १३ एप्रिल रोजी सकाळी गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, सून, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विवेकनगरातील किराणा व्यापारी वैभव काशेटवार यांचे ते वडील होत.

# नगदी रक्कम व सोन्याची दागिने सापडलेली बॅग पत्रकार शंकर कंगारे यांच्याकडून परत



**अर्धापूर (प्रतिनिधी)**–पत्रकार शंकर गंगाराम कंगारे हे नांदेडला जात असताना शेख नदीम शेख अकिम राहणार गाडीपुरा बडी दर्गा, नांदेड हे औंढा येथून नांदेडकडे आपल्या कुटुंबासह मोटार सायकलवरून जात असताना कॅरीबॅग पासदगावजवळ खाली पडली. ही कॅरीबॅग नांदेडला जाताना शंकर कंगारे यांना सापडली. परंतु कोणाची बॅग आहे. कोणास द्यावी याचा पत्ता लागत नव्हता. बॅग हरवल्याची बातमी येईल त्यास बॅग देण्यात येईल असे असताना नगदी रोख ७० हजार रुपये, सोन्याचे गळ्यातील हार, गंठण, तीन अंगठ्या व इतर सोन्याचे मनी, कपडे असा एकूण आठ तोळे व नगदी रक्कम ७० हजार रुपये असे एकूण १५ लाखांचे दागिने पत्रकार शंकर कंगारे यांनी परत करून एक माणुसकीचे दर्शन घडविले. त्यांच्या या प्रामाणिकपणाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. दागिने व पैसे परत केल्याबद्दल सदर व्यक्तीने शाल, श्रीफळ व मिठाई देऊन त्यांचा सत्कार केला.

## देविदास कांबळे यांचे निधन

**मुदखेड (प्रतिनिधी)** – मुदखेड शहरातील भीमनगर येथील रहिवासी देवीदासराव विठ्ठल कांबळे



यांचे सोमवार, दि. १३ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजताच्या दरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दि. १३ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता शहरातील बौद्ध स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, एक मुलगी, नातू असा परिवार आहे. विनोद कांबळे, मुकेश कांबळे यांचे ते वडील होत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून समाजाने लेखणी हातात घेतली –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड(प्रतिनिधी)** –भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून समाजातील नागरिकांनी लेखणी हातात घेतली आहे. त्यामुळे शिक्षणातून समाजाची मोठी प्रगती झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांचे विचार समाजात गेले पाहिजे. त्यासाठी आपण निरंतर वाचन केले पाहिजे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या अनुषंगाने समाजात शांतता व सलोखा राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे. त्याअनुषंगाने जिल्हास्तरीय शांतता समितीची बैठक सोमवारी जिल्हा नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस जिल्हा दंडाधिकारी राहुल कर्डिले, महापौर श्रीमती कविता मुळे, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, रामेश्वर व्यंजने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, डीएसबीचे सूर्यमोहन बोलमवाड, श्यामसुंदर टाक, पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम, संतोष तांबे, रामदास शेंडगे, रामेश्वर खनाळ, राजेश पुरी यांच्यासह जिल्हास्तरीय शांतता समितीचे विविध स्थायी-अस्थायी सदस्य, निमंत्रीत सदस्य, विविध धर्मगुरू, नागरिक, पत्रकार आदींची उपस्थिती होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनाने विविध चांगली व्यवस्था केली आहे. नांदेड जिल्हा हा चळवळीचा जिल्हा असून, विविध सामाजिक कार्यक्रमात प्रशासनात समाजाचा एकत्रीत सहभाग मोठा असतो. मोठ्या आवाजातील डिजे ऐवजी लेझीमसारखे उपक्रम हाती घेऊन तणाव कमी करुन आपण जयंती उत्सव आनंदात साजरे करूया, असे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यात सीसीटीव्ही प्रणाली आवश्यक असून, यासाठी प्रयत्न चालू आहेत. शांतता समितीच्या बैठकीत महिलांचा अधिक सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न केला जाईल. नांदेड जिल्ह्यातील कायदा सुव्यस्थेबाबत बैठक काही दिवसात घेतली जाईल. यात विद्यार्थ्यांसह महाविद्यालयाचा सहभाग असेल. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात सर्व नागरिकांना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शुभेच्छा दिल्या.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर समाजाने चालावे. यासाठी समता, बंधुत्व, एकोप्यातून जयंती आपण साजरी करूया. जयंती काळात युवकांवर योग्य जबाबदारी दिली पाहिजे. उन्हापासून नागरिकांची काळजी घेतली पाहिजे. यासाठी मनपाचे सर्व सहकार्य राहील, असे महापौर कविता मुळे यांनी सांगितले.

सर्वांच्या चांगल्या चर्चेतून योग्य नियोजन पोलीस प्रशासनाकडून केले जात आहे. मिरवणूक मार्गात, परिसरात संपूर्ण व्यवस्था चांगली राहील. मार्गात कोणताही अडथळा येणार नाही याची दक्षता पोलीस विभागाकडून घेतली जाते. यासाठी पोलीस प्रशासन तत्पर असल्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले. नांदेड जिल्ह्याची चांगली प्रतिमा कायम आहे. यासाठी आपल्या सर्वांचे योगदान मोलाचे आहे. कायदा सुव्यवस्था चांगली ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आपण उत्साहात साजरी करू या. यासाठी पोलीस प्रशासनाने योग्य नियोजन केले आहे. नागरिकांना कोणतीही अडचण आल्यास तात्काळ ११२ या टोलफ्री नंबरवर संपर्क साधावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी १८ तास अभ्यासाचा उपक्रम पोलीस प्रशासनाच्यावतीने साजरा केला जाणार आहे.


## Change In Name

My old name is ARTI MADHUKAR MUNDHE which now I am changing as new name: AARTI MADHUKAR MUNDHE Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

Address: ANAND NAGAR ROAD NAIK NAGAR NANDED-431605

Contact Details: 8378904217

## टी. सी. हरवली

माझी शेख ~~इसरत अहेमद या नावाची इयत्ता~~ ९ वी पासची टी. सी. व मूळ कागदपत्रे कंधार ते नांदेड दरम्यान बसने प्रवास करीत असताना हरवली आहेत. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील मोबाईलवर संपर्क साधावा ही विनंती.

संपर्क मो. ९९७५१६२२३४

## Change In Name

**My Old Name: IPTEKHAR BABUSAB SHEKH Which Now I am Changing as, New Name: SHAIKH IFTEKHAR BABUSAB Hence, forth my all Correspondence will be done as per My New Name Please Consider both Name person is same.**

**Address: AT. POST WADGAON TQ. MUKHED DIST. NANDED MAHARASHTRA 431715**

## Change In Name

My old name is SHEKHAR BHARAT GADEWAR. I have now changed my name to SHEKHAR BHARATRAO GADEWAR. Henceforth, I shall be known as Shekhar Bharatrao Gadewar for all purposes and all my future correspondence shall be done in my new name only. Please take note of the same. Signed by: Shekhar Bharatrao Gadewar. Current Address: Shekhar Bharatrao Gadewar, Shivaji Nagar Opp More Hospital, Nanded, PO: Shivajinagar, District: Nanded, Maharashtra – 431602. Permanent Address: Shekhar Bharatrao Gadewar, Shivaji Nagar Opp More Hospital, Nanded, PO: Shivajinagar,

District: Nanded, Maharashtra – 431602.

## Change In Name

**My Old Name: SYEDA JAVERIYA NAAZ SYED OSMAN Which Now I am Changing as, New Name: - SYEDA JAVERIYA NAAZ MOHD SHAHEED Hence, forth my all Correspondence will be done as per My New Name Please Consider both Name person is same. Address: H. NO.- 9- 6- 08 NEAR AYESHA FUNCTION HALL,DEGLOOR NAKA NANDED - 431604 Mob. 90111945222, 9518336684**

## Change In Name

My Old Name is **SIDDIQUI MOHAMED ABDUL AZEEM MOHAMED ABDUL HAFEEZ SIDDIQUI** which now I am changing as New Name **ABDUL AZEEM SIDDIQUI MOHAMED ABDUL HAFEEZ SIDDIQUI.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. **Sign By - ABDUL AZEEM SIDDIQUI Current Address- H. No. 9-4-1584 Hafeez Manzil Madina Nagar Degloor Naka, Nanded-431604**

**M0. No. 9890862320**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# महामानवाचे अर्थविषयक विचार

आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. त्यांनी केलेले कार्य आणि दिलेले विचार हे आपल्या देशातील सर्वच राज्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. परंतु त्यांच्या अनेक विचारांकडे आपले दुर्लक्ष झाले आहे की काय, असे वाटते. आपल्या देशाची आर्थिक परिस्थिती जर आणखीन सुधारावयाची असेल तर त्यांनी दिलेले अर्थविषयक विचार लक्षात घेऊन त्याची अंमलबजावणी करणे तेवढेच गरजेचे आहे. त्यांनी १९२७ साली अर्थशास्त्रामध्ये पीएच.डी. मिळवली. त्यावेळी भारतामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असे एकमेव व्यक्ती होते ज्यांच्याकडे इतकी उच्च पदवी होती. त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि कोलंबिया युनिव्हर्सिटीमधूनही पदव्या संपादन केल्या होत्या. त्यांनी लिहिलेला अर्थशास्त्रविषयक ग्रंथ आजही आपल्या देशासाठी मार्गदर्शक आहे, परंतु त्या ग्रंथाचा फारसा विचार केला गेला आहे असे दिसत नाही. आज आपल्या देशातील लोकशाही ही डॉ. आंबेडकर यांच्यामुळेच टिकून आहे. महान व्यक्तीची किंमत ती व्यक्ती या जगातून निघून गेल्यानंतरच लोकांना कळते. निदान असे आपल्या देशात तरी होते. तसेच ह्या महामानवाबद्दल झाले की काय असे वाटू लागले आहे, कारण त्यांच्या निर्वाणानंतर १९९० मध्ये त्यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या सन्मानार्थ अनेक इमारती, क्रीडांगणे, महाविद्यालये, आणि सार्वजनिक ठिकाणांना त्यांचे नाव देण्यात आले. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली ज्यातून आज आपल्याला सातत्याने प्रेरणा मिळते आहे. त्यांनी लिहिलेले भारतीय संविधान यावरच आपली लोकशाही टिकून आहे. त्यांची काही पुस्तके अप्रकाशित राहिली होती जी त्यांच्या निर्वाणानंतर प्रकाशित करण्यात आली. बाबासाहेबांनी लिहिलेल्या पुस्तकांपैकी काही पुस्तके द बुद्ध अँड हिस धम्मा, पाकिस्तान ऑर द पार्टीशन ऑफ इंडिया, द अनटचेबल्स- व्हू वेर दे अँड व्हाय दे बिकेम अनटचेबल्स?, एसेज ऑन अनटचेबल्स अँड अनटचबिलिटी, रिडल्स इन हिंदुइसम, व्हॉट काँग्रेस अँड गांधी हॅव डन टू द अनटचेबल्स, कास्ट्स इन इंडिया: देअर मेकॅनिसम, जेनेसिस अँड डेव्हलोपमेंट यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. ते एक थोर समाजसुधारक होते त्याच बरोबर ते नेते, अर्थतज्ज्ञ, आणि उत्कृष्ट कायदेपंडित देखील होते. दलितांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी आणि त्यांना समाजामध्ये समान न्याय आणि वागणूक मिळवून देण्यासाठी ते झटत राहिले. त्यांचे संपूर्ण आयुष्य म्हणजेच हा जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्धचा लढाच म्हणावा लागेल. त्यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महू (जे आता मध्यप्रदेशमध्ये आहे) येथे झाला. त्यावेळी दलितांना समाजामध्ये अमानुष वागणूक मिळत असे व खूप भेदभाव केला जाई. दलित मुलांना शाळेत प्रवेश होते, पण त्यांना वेगळे बसवण्यात येई आणि त्याचबरोबर त्यांना बसण्यासाठी घरून स्वतःचे गोणपाट आणावे लागत असे. त्यांना पाण्याच्या भांड्यांना हात लावण्याची परवानगी नव्हती. बाबासाहेब अशाच विद्यार्थ्यांपैकी एक होते. त्यांनी ह्या सर्व गोष्टींना तोंड देत आपले शिक्षण पूर्ण केले. ते दलित समाजातील पहिले विद्यार्थी होते ज्यांनी एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये १८९७ मध्ये प्रवेश मिळविला होता. त्यांनी १९०७ मध्ये मॅट्रिकची परीक्षा पास केली आणि मुंबई विद्यापीठाच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला. १९१२ मध्ये त्यांनी अर्थशास्त्रामध्ये पदवी मिळवली आणि जून १९१५ मध्ये एम.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनी एक शिक्षक आणि अकाउंटंटचे काम सुरु केले आणि सोबत स्वतःचा व्यवसाय सुरु केला. पण जेव्हा त्यांच्या ग्राहकांना समजले की ते दलित आहेत तेव्हा त्यांनी त्यांच्याकडे पाठ फिरवली आणि त्यांचा व्यवसाय बंद झाला. जेव्हा दलितांची मदत करण्यासाठी कोणीही पुढे येत नव्हते त्यावेळी डॉ. आंबेडकर दलितांना मदत करण्यासाठी उभे राहिले. त्यांनी दलितांचा विकास करण्यास आणि त्यांना समान हक्क आणि न्याय मिळवून देण्यास मदत केली. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध लढा दिला. त्यांनी दलितांसाठी सार्वजनिक पाणपोई सुरु करण्यासाठी मोर्चे काढण्यास सुरुवात केली. महाडमधील चवदार टाळ्याचा सत्याग्रह जगप्रसिद्ध आहे. त्यांनी दलितांना मंदिरांमध्ये प्रवेश मिळवून दिला. दलितांसाठी लढण्याबरोबरच डॉ. आंबेडकर यांनी देशाचा आर्थिक आणि सामाजिक कणा मजबूत करण्यासाठीही योगदान दिले. अर्थशास्त्र आणि राजनैतिक क्षेत्रातही त्यांनी खूप मोलाचे काम केले. भारतीय संविधानाचे ते शिल्पकार होते. त्यांनी महिलांचा आणि मजुरांच्या हक्कांसाठी लढा दिला. मुंबईमधील गव्हर्नमेंट कायदा कॉलेजचे ते २ वर्षे प्राचार्य होते. देशातील अस्पृश्यता दूर करण्यासाठी आणि दलितांना समान न्याय आणि हक्क मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी शेवटपर्यंत लढा दिला. डॉ. आंबेडकर हे स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार होते. आज संपूर्ण देश त्यांची जयंती साजरी करतो आहे. असे करीत असताना त्यांनी चालविलेला अन्याय आणि अत्याचाराविरुद्धचा लढा आपल्यालाही पुढे चालवायचा आहे आणि हीच त्यांना खरी मानवंदना ठरेल.

# चला, डॉ. बांबासाहेबांच्या संगतीत राहूया!



महामानव कालातीत असतात. ते आपल्या अस्तित्वाने आपला वर्तमान फुलवून टाकतात आणि भविष्यकाळ आजीवन जागृत करून जातात. वृक्षाप्रमाणे स्वतः अंगावर ऊन, वारा, पाऊस झेलून भविष्याला महान विचारांची सावली, ग्रंथरूपी सुगंध आणि विचारांची फळे अनंत काळासाठी आपल्याला विनामूल्य मागे ठेवून जातात. सज्जनहो, आज आपण बोधिसत्व, महामानव, प्रज्ञासूर्य, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करताना सर्वांनीच त्यांची नित्य संगत करणे काळाची गरज बनली आहे. भारत मातेच्या वीर पुरुषांचा अहोरात्र संघर्ष, कष्टाने आणि रक्ताने स्वतंत्र झालेली भारत माता आणि तिचे स्वातंत्र्य आपल्याला अबाधित, चिरकाल ठेवताना इथला क्रांतीचा, नवनिर्माणाचा, स्वातंत्र्याचा विचार चिरंतन, जिवंत ठेवावा लागणार आहे. मित्रहो, सत्याच्या, क्रांतीच्या मार्गावर चालणाऱ्या लोकांसाठी काळ नेहमीच खडतर असतो.

ज्या ज्या महापुरुषांनी जगाला नवा, सत्याचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न केला त्यांच्या जीवनात त्यांना प्रचंड संघर्ष करताना त्यांच्या जीवनाचा शेवट गोड झालेला आढळत नाही. अगदी सॉक्रेटीस, रोमेल, येशू ख्रिस्त, नामदेव, ज्ञानोबा, तुकोबा, एकनाथ, जोतीबा, सावित्रीबाई, बाबासाहेब आणि अलीकडच्या समाजसुधारकांचा शेवट खडतर झालेला इतिहासाला माहिती आहे. याचा अर्थ काळ बदलला की; सत्याची कास धरणारी नवीन माणसे निर्माण व्हायला पाहिजेत की नाही? हा सतत बोचणारा प्रश्न मला नेहमीच सतावत असतो. आज काल सगळीकडे केवळ चर्चा-प्रतिक्रिया देणाऱ्या टोळ्या सर्वत्र दिसताहेत, मात्र कुणीही मांजराच्या गळ्यात घंटा बांधायला धजावत नाही. ठीक आहे. हेही दिवस जातील. असे असले तरी अलीकडच्या दहा वर्षात माणसं प्रचंड बदलली आहेत.

एकीकडे क्रांतीच्या वल्गना करताना दुसरीकडे माणूस भ्रांती हरवत चाललाय. वेगवेगळे इझम आणि विविध जात, धर्म, पंथाच्या कट्टरता माणसातील खरा माणूस झाकाळून टाकताहेत. अगोदरही माणसांचे संघर्ष होते, परंतु त्याला एवढे टोकदार रूप नव्हते. टिळक-आगरकर, गांधी-आंबेडकर इत्यादी विचारवंत धुरिणांमध्ये मतभेद होते, परंतु मनभेद मात्र नव्हते. ही सगळी माणसे आपल्या वैचारिक अधिष्ठानावर ठाम असताना कधीही कुणी हिंसेचा मार्ग अवलंबिलेला वाचनात नाही.

आज मात्र चित्र प्रचंड बदलले आहे. जात, धर्म, रंग या बाबतीत माणसे कट्टर झा-लेली पाहून येणारा काळ कसा असेल(?) याची भीती वाटते! जात, धर्म, रंग याला अती स्वार्थ आणि राजकारणाची जोड दिली की त्याचे बीभत्स स्वरूप समोर येत असते. जगाला प्रेम अर्पावे सारखे काव्य, वसुधैव कुटुंबकम वचन किंवा सत्यम शिवम सुंदरम सारखी गीते कालबाह्य होऊन फक्त ऐकायलाच शिल्लक राहतील का? असा प्रश्न मनाला पडतो. त्यात कविवर्य इंद्रजीत भालेराव यांच्या 'गर्भखुणा' कवितेतील-

हे सिद्धच झालंय की
लोकांना प्रेम नकोय विद्वेष हवाय
पण असं कसं होऊ शकतं?
विचार करणाऱ्या प्रत्येकाला
हा प्रश्न पडलाय

ह्या ओळी आणखीनच अस्वस्थ आणि अंतर्मुख करतात. असे असले तरी महापुरुष आपल्या देदीप्यमान चारित्र्य आणि चरित्राने आपल्यासोबत धीरोदात्तपणे उभे असतात हे विसरून चालणार नाही.

त्यातल्या त्यात डॉ. भीमराव रामजी आंबेडकरांसारखा प्रज्ञावंत महामानव नित्य सोबतीने असल्यास आपल्याला खडतर काळात अवघड होत चाललेला रस्ता सुकर व्हायला लागतो. अगदी वयाच्या नवव्या वर्षांपासून संघर्षात वाढलेल्या बाबासाहेबांना आपल्याला आपले सन्मित्र बनवावे लागेल. बाबासाहेबांचा एक एक दिवस आणि त्यांच्या जीवनातील एकेका प्रसंगाची जाण आणि भान ठेवून त्यांच्या लेखणीचे सामर्थ्य सोबत बाळगावे लागेल. जगातली देखणी असणारी बाबासाहेबांची लेखणी आपल्याला सोबत बाळगावी ला-गेल. जगात आतापर्यंत या लेखणीने अनेक क्रांतीची बीजं पेरली आहेत. त्यासाठी आपण बोधीसत्वाच्या लेखणीचा वारसा जपणे काळाची गरज आहे. अलीकडे शिक्षणाचे प्रम-ाण वाढले आहे; परंतु त्या प्रमाणात क्रांतिकारी, सडेतोड लेखनाचे प्रमाण अत्यल्प होत चालले आहे. शिकलेल्या लोकांनी आपल्या रोखठोक लेखणी म्यान केल्यामुळे इथे अविचाराचे तणकट फोफावले आहे. त्याच्या जोडीला त्याग नावाची कृती तर कुठेच दिसायला तयार नाही. पोटार्थी आणि जगण्याला हापापले-ली माणसे कधीच क्रांती करू शकत नाहीत. त्यासाठी लेखणी आणि विचाराला त्यागाची जोड दिल्यास क्रांती फार दूर नाही. नक्कीच यात काही निरपराध, निष्पाप, विचारवंत लोकांचे बळी जातील, पण तेच नव्या पिढीचे नवे महात्मे असतील! क्रांतिकारी, नवीन महात्मे आणणार तरी कुठून?

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ भाषण, मिरवणूक, लेख, पुस्तके छापण्याचे विषय नसून तो जीवनात अंगीकारण्याचा एक सर्वोत्तम, महान मार्ग आहे. भीम विचारांचा वसा घेणे काळाची गरज बनली आहे.

भीम माझा जीव आहे
गोर गरिबांची कीव आहे
विचारतोस काय गड्या?
भीम भारत जाणीव आहे

असे लिहून, हा महान विचार नित्य सोबत बाळगावा लागेल. सत्यासाठी जीवनात संघर्ष, लोकांना अंगावर घेणे याची सवय लावून घ्यायची असेल तर बाबासाहेबांची सतत संगती अत्यावश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकाने भारतीय संविधान आपला जीव की प्राण आहे! असे समजून त्याच्या रक्षणासाठी सदैव तत्पर आणि सज्ज असलेच पाहिजे. आता आपल्याला अभ्यास करून नवीन संविधान लिहिण्याची गरज नाही. फक्त डोळ्यात तेल घालून मोफत मिळालेला हा अनमोल खजाना जपावा लागणार आहे. असे करताना आपल्यात कोणतीही कट्टरता येता कामा नये.

बाबासाहेबांचा एक एक विचार आणि महान ग्रंथ संपदा आपल्याला सोबतीने ठेवावी लागेल. असे असले तरी त्यांची व्यासंगी वृत्ती, जिद्द, चिकाटी आणि एखाद्या विषयाचे संशोधन करून त्याची मांडणी कशी करावी? हेही शिकून घ्यावे लागेल. एखाद्या प्रश्नाच्या मुळाशी कसे जावे? त्याची सोडवणूक कशी करावी? हे आपल्याला त्यांच्याकडून शिकावे लागेल. असे असले तरी बहुजनांचे विखुरलेले संघटन मजबूत करावे लागेल. विविध जाती, धर्मातील विखुरलेल्या आंबेडकरवादी लोकांची एक वज्रमुठ बांधावी लागेल. आपला संघर्ष कुण्या व्यक्ती विरुद्ध न उभारता सर्वांनी एकजुटीने देशाच्या उत्थानासाठी काम करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी इथे प्रत्येकाला आपल्यातील 'मी' बाहेर काढून 'आम्ही' व्हावे लागेल. या वेळी केवळ देश हा धर्म सोबत असायला हवा.

बाबासाहेबांची प्रज्ञा, शील, करुणा हे तीन मूलगामी शस्त्रं सोबत बाळगताना आपले स्वत्व बाजूला ठेवावे लागेल. मोठ्या मनाने बाहेर यावे लागेल. अगोदर सामाजिक लढाई एकोप्याने लढून लोकांमध्ये नवे स्फुल्लिंग चेतवावे लागेल. सामान्य लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडताना महाग होत चाललेले जगणे स्वस्त करावे लागेल. लोकांनी आपल्या गरजा मर्यादित कराव्या लागतील. व्यसने, भपकेबाजपणा, खोटा मोठेपणा, कुवत नसताना खर्च करण्याची सवय इत्यादी बाबतीत समाज जागृत करावा लागेल. लोकांना आपल्या मर्यादांची जाणीव करून द्यावी लागेल. फुकटचे, स्वस्तातले, सरकारी योजनांवर जगणे मर्यादित करण्याचे प्रबोधन करावे लागेल. असे झाल्यास माणूस सरकार अथवा एखाद्या व्यक्तीवर अवलंबून रा-हणार नाही. त्याला कष्ट करायची आणि कष्टाचे खायची सवय लागेल! मागण्याच्या वृत्तीला आळा बसेल. स्वाभिमान जागृत होईल! असे होणे म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संगती लागणे होय! चला तर मग, बाबासाहेबांसोबत आनंदी जगूया!

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी (महाराष्ट्र)
मो. ९१५८०६४०६८

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य

प्रचंड बुद्धिमत्ता, समाजासाठी असीम त्याग करणारे, दलित समाजाला हक्क मिळवून देण-ारे, महाडचा सत्याग्रह, शेतकऱ्यांचे कैवारी, मनुस्मृतीचे दहन, काळाराम मंदिर सत्याग्रह, गोलमेज परिषद, पुणे करार, स्वतंत्र मजूर पक्षा-ची स्थापना, बहीष्कृत हितकरणी सभा, दलित शिक्षणा संस्थांची स्थापना, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना, महिलांसाठी कार्य, सर्व क्षेत्रांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचे पुस्तक घ्या, कारण भाकरी तुम्हाला जगण्यास म दत करेल आणि पुस्तक तुम्हाला कसं जगायचं ते शिकवेल अशा विचारसरणीच्या महामानवास आज जयंती निमित्त विनम्र अभिवादन!

अस्पृश्यताही भारतीय समाजाला लागलेली कीड आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनार्थ तीव्र लढा दिला. १९२४ ला बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन करून दलितांच्या शिक्षणासाठी आणि सामाजिक हक्कांसाठी प्रयत्न केले. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह १९२७ ला केला, कारण पाणी ही शुल्लक बाबी, परंतु मानवी जगण्याचा अत्यंत आवश्यक घटक अस्पृश्यांना मिळवण्यासाठी वन-वन भटकावे लागत असे. सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा हक्कही त्यांना नव्हता म्हणून सत्याग्रह केला. काळा राम मंदिर सत्याग्रह १९३० ईश्वराने निर्माण केलेली सर्वात सुंदर निर्मिती म्हणजे मनुष्य आणि या मनुष्य-मनुष्यामध्ये भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात भेदभाव केला जायचा परमेश्वराला म्हणजेच ईश्वराला भेटण्याचा, मंदिरात जाण्याचा अधिकार अस्पृश्यांना नव्हता त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काळाराम मंदिर प्रवेश करून तो हक्क दलितांना मिळवून दिला. एकंदरीत मानवी हक्क अस्पृश्यांना मिळून देण्याचा लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर चालवला आणि संविधानाच्या माध्यमातून तो लढा यशस्वी केला.

महिला सक्षमीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अमूल्य असे योगदान आहे. त्यासाठी त्यांनी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार मिळावेत म्हणून लढा दिला. त्याचबरोबर हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून महिलांना मालमत्तेत वारसा हक्क, घटस्फोटाचा समान हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करताना मी त्या समाजाच्या स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली त्यावरून त्या समाजाचे मोजमाप करतो भारतीय स्त्रियांवर हजारो वर्षापासून लादलेली आर्थिक, सामाजिक, धार्मिक गुलामगिरी कायद्याच्या माध्यमातून नष्ट केली, स्त्री-पुरुषातील भेद नष्ट करून समानतेचा अधिकार स्त्रियांना दिला, कामगार महिलांच्या वेतनाच्या अनुषंगाने हितसंवर्धनाचा आणि सोयीचा मसुदा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केला, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने



वेतन मिळावे, स्त्रियांना प्रसूती रजा मिळावी, स्त्रियांच्या मुलांची कामाच्या ठिकाणी काळजी घेण्यासाठी पाळणाघरे असावी, स्त्रियांना मतदानाचा अधिकार असावा हा विचार समाजात रुजवला. कायदेमंत्री असताना हिंदू कोड बिलासंबंधी मसुदा संसदेत मांडला. २८ फेब्रुवारी १९४८ भारतातील सर्व जाती-धर्मातील स्त्रियांची जाचक रूढी आणि परंपरा यापासून सुटका व्हावी यासाठी तो मसुदा होता. त्यात स्त्रियांना घटस्पोटाचा हक्क, विधवा पुनर्विवाह चा हक्क, मुलींना, संपत्तीमध्ये हक्क, पोटगीचा हक्क बहुपत्नीत्व प्रथा प्रतिबंधात्मक विचार या संदर्भाने स्त्रियांना न्याय मिळवून दिला. स्त्रियांना आपल्या हक्काविषयी जागरूकता आणण्यासाठी १९४२ ला नागपूर येथे अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भरवली. स्त्रियांचा स्वातंत्र्याचा जाहीरनामा मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, लग्न ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे, परंतु ज्याप्रमाणे पुरुषांना आपली पत्नी निवडण्याचा हक्क आहे त्याप्रमाणे तो हक्क स्त्रियांनाही असावा. स्त्री ही पुरुषाची पत्नी त्याचबरोबर ती मैत्रीण असावी असे ते म्हणतात. ती गुलाम असता कामा नये. मुलगा- मुलगी भेद करणे खूप चुकीचे आहे ज्या देशात ५०% स्त्रिया स्वतंत्र नसतात तो देश अर्धा गुलाम असतो, हिंदू विवाह कायदा १९५५, हिंदू दत्तक विधान निर्वाह कायदा १९५६, हिंदू उत्तर अधिकारी अधिनियम १९५६, कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ यात हिंदू कोड बिलाचेच प्रतिबिंब पाहायला मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या गुलामगिरीचा अस्पृश्यता व जातीयतेचा व वर्णवादाचा सहसंबंध लोकांना पटवून दिला. स्त्रियांच्या वाईट अवस्थेत कारणीभूत असलेल्या अंधश्रद्धा, पुराने, महाकाव्यासह प्रमाण सिद्ध केले. भारतीय स्त्री जीवनाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नवसंजीवनी दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात सर्वोच्च स्थान हे शिक्षणाला दिले. शिक्षणामुळे मानवी मेंदू प्रगत होतो, ज्ञानाचा विकास होतो, बऱ्या वाईट त्याची कल्पना प्रगल्भ होते असे त्यांचे मत हो-ते. व्यक्तीला अन्यायाविरुद्ध उठाव करण्याची सामर्थ्य शिक्षणामुळेच येते असा त्यांचा ठाम विश्वास होता त्यामुळे त्यांनी राज्यघटनेच्या ४५ व्या कलमात वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी शासनावर टाकलेली आहे किंवा शासनावर आहे अशी तरतूद केलेली आहे. शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करताना ते म्हणतात, शिक्षण म्हणजे सर्वसामान्यांचे प्रबोधन होय. १९२५ ला दलित वसतिगृहाची स्थापना केली ज्यात दलित गरीब विद्यार्थ्यांना निवास, भोजन, कपडे व शैक्षणिक सामग्री पुरवली जात असे. त्याचबरोबर १४ जून १९२८ रोजी दलित शिक्षण संस्थांच्या माध्यमातून माध्यमिक शिक्षणाची सोय दलितांची केली. अस्पृश्य, निम्न, मध्यमवर्गात शिक्षणाचा प्रचार प्रसार व्हावा आणि याही वर्गाने उच्च शिक्षण घ्यावे या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना १८ जुलै १९४५ ला केली आणि त्याच्या माध्यमातून मुंबई येथे सिद्धार्थ कला विज्ञान महाविद्यालय सुरू केले. तसेच १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय १९५३ मध्ये मुंबई येथे सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय आणि १९५६ ला मुंबईत सिद्धार्थ विधी महाविद्यालयाची निर्मिती केली .बहुजन समाज बांधवांसाठी शिक्षणाचा प्रवास सुरू केला म्हणजे भारतीय शिक्षणाच्या बहुजनिकरणातून क्रांती आणि क्रांतीतून प्रगती निर्माण करण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला .

कामगार मंत्री असताना काम गारासाठी कामाचे तास कमी करणे, म हागाई भत्ता आणि महिलांसाठी प्रसूती रजा यासारखे कायदे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. शेतकऱ्यांनी महार वतन पद्धती रद्द करण्यासाठी लढा दिला. वर्तमानपत्र हे समाजाच्या विकासात चालना देणारे महत्त्वपूर्ण साधन आहे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाणीव होती. त्यांनी वर्तमानपत्राद्वारे अस्पृश्यांवर होणारे अन्याय व अत्याचार समाजासमोर मांडले, स्पर्श समाजात ही परिवर्तनाचा विचार रुजवणे हा त्यांचा वर्तमानपत्र सुरू करण्यापाठीमागचा उद्देश होता. अस्पृश्यांच्या चळवळीला विरोध करणाऱ्यांना सडेतोड उत्तर देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्तमानपत्राची गरज वाटत होती. १९२० मध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या आर्थिक मदतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक ना-वाचे वृत्तपत्र सुरू केले. १९२७ मध्ये बहिष्कृत भारत हे पाक्षिक सुरू केले .१९२८ मध्ये समता संघा-तर्फे समता वर्तपत्र सुरू केले. त्यांनी वेगवेगळ्या वर्तम ानपत्रातून विचार मांडले व त्या विचारातून त्यांच्या झुंजार पत्रिकेची पत्रकारितेची जाणीव होते. अन्याय करणाऱ्या विविध विषयांची चर्चा त्यांनी आपल्या वर्तमानपत्रातून केली. १९३९ ला जनता नावाचे वर्तमानपत्र सुरू केले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील दुःख, अन्याय आपल्या पत्रकारितेतून जगासमोर मांडून त्यावर उपाय सांगितला आणि त्यासाठी वर्तमानपत्राचा प्रभावी वापर केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता, स्वातंत्र्य, बंधुता या विचारांचे पुरस्कर्ते होते. सामाजिक समता हिंदू धर्मात शक्य नसल्यानचे लक्षात आल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑगस्ट १९५६ रोजी नागपूर येथे आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला ज्वाद्वारे त्यांनी आत्मसन्मान आणि मानवी हक्काचा मार्ग दाखवला. भारतीय समाजातील शोषित वर्गाला मानसिक गुलामगिरीतून मुक्त करून त्यांना सन्मानाने जगण्याचा मार्ग खुला केला.

**-डॉ. सत्यभामा जाधव**
सदस्या बाल कल्याण समिती,
नांदेड
मो. ९४०३७४४७१५

# बैसाखी : धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पर्व

पंजाबमध्ये मार्च आणि एप्रिल महिन्यात गव्हाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जातं. पीक चांगलं उगवलं की शेतकऱ्यांचे बैसाखी सण आनंदात साजरा होतो एवढे नक्की. एक वैशाख म्हणजेच बैसाखीच्या दिवशी शेतकऱ्यांचे धान्य गोळा करण्याचे व विक्री करण्याचे कार्य सुरु होते. या निमित्ताने घरात लक्ष्मीचे आगमन होते आणि सण साजरा करण्यासाठी ऊर्जा प्राप्त होते.

शीख गुरुंच्या काळात बैसाखी सणाचे स्वरुप थोडेफार परिवर्तित झाले. दहावे गुरु, श्री गुरु गोबिंदसिंघजी महाराज यांनी एक वैशाख (बैसाखी) तिथीला खालसा पंथाची स्थाप-ना केली आणि या पर्वाला धार्मिक महत्व प्राप्त झाले. गुरु गोबिंदसिंघजी महाराज यांनी ई. स. १६९९ च्या बैसाखीचे मुहूर्त साधत शीख पंथाचे रूपांतरण खालसा पंथात केल्याची एक धार्मिक पण क्रान्तिकारक अशी ऐतहासिक घटना जगाने अनुभवली. काही शीख इतिहासकारांच्यामते त्या वेळी जवळपास नवद हजाराच्या संख्येत सर्व-धर्मीय अनुयायांनी गुरुजींकडून अमृतपानाची दीक्षा स्वीकारत खालसा पंथीय होण्याचा मान मिळवला होता.

सण १६९९ चे बैसाखी सण खालसा पंथासाठी सैद्धांतिक आणी संकल्पित अध्याय घेवून आले होते. त्यामुळेच भारतातील विविध धर्म, जातीं आणि संस्कृतींचे रक्षण साध्य झाले. अन्यथा आज देशाची संस्कृती काही वेगळीच दिसली असती. अमृतपानाच्या दीक्षेनंतर श्री गुरु गोबिंद सिंघजी महाराज यांनी देशातील मानव जातींवर वाढत चाललेल्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध मोठा लढा उभारला. खालसा पंथ स्थापनेच्या विधीतच गुरुजींनी आपल्या अनुयायींना पंच-ककार प्रदान केले होते. त्यात केश, कंघा, कडा, कछहरा आणि कृपान अशा तत्वांचा समावेश होता. त्यात कृपाण या तत्वाचे उपयोग अन्याय-अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी दिले गेलेले आहे. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाची रचना करतावेळी खालसा पंथाच्या धार्मिक आचरण व धर्म अवलंबन स्वातंत्र्याचे अधिकार आबाधित राहावे यासाठी धर्माचा स्वतः अभ्यास केला होता. संविधानाच्या आर्टिकल २५ (ब) अनुसार खालसा पंथाची दीक्षा प्राप्त अमृतधारी प्रत्येक शीख (स्त्री व पुरुष) व्यक्तीला कृपाण बाळगण्याचे धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त आहेत. केश हे ऋषित्वाचे प्रतीक आहेत. तर कंघा, कडा आणि कछहरा हे स्वयं अनुशासनाचे अंकुश लावणारे यन्त्रा सारखे तत्व आहेत. खालसा पंथीय हा विनयशील, वीर, आत्म निर्भर आणी परोपकारी स्वाभावाचा असावा असे श्री गुरु गोबिंद सिंघजी यांना अभिप्रेत होते. एक चांगले राष्ट्र घडवण्यासाठी, अन्याय-अत्याचाराच्या प्रतिकारासाठी, देशाच्या संस्कृति रक्षणार्थ असल्या प्रकराची अनिवार्यता होती आणी खालसा धर्म त्यावर खरा उतरला.

बैसाखी पर्व हे केवळ धार्मिक सण नसून समाजात समरसता आणि एकता स्थापित करण्याचे साधन आहे. यानिमित्त लोकं भेदभाव दूर सारून एकमेकांना शुभेच्छा देतात. या मुहूर्तावर सोयरिकी करतात, लग्नाच्या मुहूर्त काढतात. दान - धर्म करतात. तीर्थयात्रा करतात. पंजाबच्या मातीत कला-गुण आणि संगीतास प्रचंड वाव आहे. बैसाखी सणावेळी पारंपरिक नृत्य भंगडा, गिद्दा आणि गायन करतांना लोकांना आपण पाहू शकतो. ग्रामीण क्षेत्रात शीख इतिहासावर आधारित लोक कथा आणि डाढी जत्था कीर्तन इतियादी पाहायला मिळते. म्हणून बैसाखी पर्व हा धर्म, समाज आणि संस्कृतीला पुरक असा सण आहे.

**-स. रविन्द्र सिंघ मोदी,**
नांदेड
मो. ९४२०६५४५७४

## चौदा एप्रिल

बाबासाहेब,
आज चौदा एप्रिल.
तसा मी बालपणीच
बापाच्या बोटाला धरून
मिरवणुकीत गेलो
उशिराच कळाला आम्हांला
निजामी राजवटीतले ना आम्ही
जसे तुमचे नाव इकडे आले
तशी जयंती साजरी होऊ लागली
तेव्हा पाळण्यात प्रतिमा तुमची
बाळ खेळतेय वाटायचे
रडला नाहीत कधी
लढलात मात्र हयातभर
पाय पाळण्यात दिसले तुमचे
इकडे गर्द काळोख
गुलामीचा आमच्यावर
भेडसावत होतो आम्हांला
'आम्हीही माणसं आहोत'
याची खबरच नव्हती आम्हांला
तेव्हा तुम्ही काळ्या पाटीवर
पांढऱ्या कलमेनं
लिहून गेलात 'शिका'
अन् हळूहळू आम्ही
उभे राहायला लागलोत
काय जादू केली तुम्ही
हजारो वर्षांचे साखळदंड
निखळून पडले की,
माणूस झालो आम्ही
दुसऱ्यांदा स्वातंत्र्य मिळाले
एकदा निजामी जुल्मातून
अन् आता गुलामीतून
काय करिष्मा आहे बाबासाहेब
तुमच्या १४ एप्रिलचा.

**-जे. राजहंस**
नांदेड


शैक्षणिक क्रांतीसाठी आपले जीवन अर्पण करणारे
महामानव, क्रांतिसूर्य
महात्मा
जोतिबा फुले
सामाजिक समतेचे पुरस्कर्ते
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
संपूर्ण जगाला १२ व्या शतकात लोकशाही देणारे
महात्मा बस्वेश्वर
यांच्या जयंती निमित्त कोटी कोटी वंदन..!
शुभेच्छुक : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टी देगलूर शहर व ग्रामीण


शैक्षणिक क्रांतीसाठी आपले जीवन अर्पण करणारे
महामानव, क्रांतिसूर्य
महात्मा
जोतिबा फुले
सामाजिक समतेचे पुरस्कर्ते
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
संपूर्ण जगाला १२ व्या शतकात लोकशाही देणारे
महात्मा बस्वेश्वर
यांच्या जयंती निमित्त
कोटी कोटी वंदन..!
शुभेच्छुक : डॉ. सौ. पूजा सचिन गायकवाड


शैक्षणिक क्रांतीसाठी आपले जीवन अर्पण करणारे
महामानव, क्रांतिसूर्य
महात्मा
जोतिबा फुले
सामाजिक समतेचे पुरस्कर्ते
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
संपूर्ण जगाला १२ व्या शतकात लोकशाही देणारे
महात्मा बस्वेश्वर
यांच्या जयंती निमित्त
कोटी कोटी वंदन..!
व्यंकटराव पाटील गोजेगावकर
प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी


शैक्षणिक क्रांतीसाठी आपले जीवन अर्पण करणारे
महामानव, क्रांतिसूर्य
महात्मा
जोतिबा फुले
सामाजिक समतेचे पुरस्कर्ते
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
संपूर्ण जगाला १२ व्या शतकात लोकशाही देणारे
महात्मा बस्वेश्वर
यांच्या जयंती निमित्त
कोटी कोटी वंदन..!
सौ. विजयमाला बालाजीराव टेकाळे
प्रथम महिला लोकनियुक्त नगराध्यक्षा
देगलूर नगर परिषद,देगलूर


शैक्षणिक क्रांतीसाठी आपले जीवन अर्पण करणारे
महामानव, क्रांतिसूर्य
महात्मा
जोतिबा फुले
सामाजिक समतेचे पुरस्कर्ते
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
संपूर्ण जगाला १२ व्या शतकात लोकशाही देणारे
महात्मा बस्वेश्वर
यांच्या जयंती निमित्त
कोटी कोटी वंदन..!
मारोतीराव व्यं. मोटरगेकर पाटील
देगलूर


शैक्षणिक क्रांतीसाठी आपले जीवन अर्पण करणारे
महामानव, क्रांतिसूर्य
महात्मा
जोतिबा फुले
सामाजिक समतेचे पुरस्कर्ते
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
संपूर्ण जगाला १२ व्या शतकात लोकशाही देणारे
महात्मा बस्वेश्वर
शाखावार नंदकिशोर लक्ष्मणराव
नगरसेवक, देगलूर नगर परिषद,देगलूर


शैक्षणिक क्रांतीसाठी आपले जीवन अर्पण करणारे
महामानव, क्रांतिसूर्य
महात्मा
जोतिबा फुले
सामाजिक समतेचे पुरस्कर्ते
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
संपूर्ण जगाला १२ व्या शतकात लोकशाही देणारे
महात्मा बस्वेश्वर
यांच्या जयंती निमित्त
कोटी कोटी वंदन..!
अनुप विजया वस्त्रालय ग्रुप
नारायणी THE BOUTIQUE
फॅमिली शॉपिंग मॉल
तळगल्ली, देगलूर
703 822 2444
02463-255195


शैक्षणिक क्रांतीसाठी आपले जीवन अर्पण करणारे
महामानव, क्रांतिसूर्य
महात्मा
जोतिबा फुले
सामाजिक समतेचे पुरस्कर्ते
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
संपूर्ण जगाला १२ व्या शतकात लोकशाही देणारे
महात्मा बस्वेश्वर
यांच्या जयंती निमित्त
कोटी कोटी वंदन..!
संजय व्यंकटराव पाटील ठाणेकर,देगलूर



शैक्षणिक क्रांतीसाठी आपले जीवन अर्पण करणारे
महामानव, क्रांतिसूर्य
महात्मा
जोतिबा फुले
सामाजिक समतेचे पुरस्कर्ते
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
संपूर्ण जगाला १२ व्या शतकात लोकशाही देणारे
महात्मा बस्वेश्वर
यांच्या जयंती निमित्त
कोटी कोटी वंदन..!
देवेंद्र बालाजीराव मोतेवार
शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, देगलूर



शैक्षणिक क्रांतीसाठी आपले जीवन अर्पण करणारे
महामानव, क्रांतिसूर्य
महात्मा
जोतिबा फुले
सामाजिक समतेचे पुरस्कर्ते
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
संपूर्ण जगाला १२ व्या शतकात लोकशाही देणारे
महात्मा बस्वेश्वर
यांच्या जयंती निमित्त कोटी कोटी वंदन...!
प्रो.प्रा.सचिन मुरलिधर वट्टमवार
प्रो.प्रा. सागर सचिन वट्टमवार
वट्टमवार
ज्वेलर्स
आमच्या येथे हॉलमार्क व 91.6 ऑर्डर प्रमाणे योग्य दरात तयार करुन मिळतील.
पत्ता : जुना सराफा, देगलूर जि.नांदेड
रेखावार चंद्रकांत
रेखावार जयराम
रेखावार राम
मे.हनमान्लू माणिकराव रेखावार
ज्वेलर्स
सोने व चांदीचे तयार दागिन्याचे व्यापारी
पत्ता : जुना सराफा, देगलूर जि.नांदेड
४३ वर्षापासून शेतकऱ्यांच्या विश्वसापात्र ठरलेले एकमेव
मामडे फर्टीलायझर्स
मोंढा देगलूर जि.नांदेड
नामांकीत कंपनीचे बी-बियाणे,
खते, किटकनाशकाचे अधिकृत विक्रेते.
व्यंकटेश्वरा
दाल इंडस्ट्रीज
खानापूर ता.देगलूर जि.नांदेड










## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.




## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...





किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com